महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ◆२२ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक०६१ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## गौरी गणपती सण कोकणवासियांना टोलमाफी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गणेशोत्सव हा मराठीजनांचा सर्वात मोठा उत्सव असून यंदाच्या वर्षापासून राज्य उत्सव म्हणून साजरा होत आहे. त्यासाठी, राज्य सरकारने काही एसओपी देखील जारी केली असून गणेश मंडळांमध्ये उत्साह पाहायला मिळत आहे. मुंबईसह कोकणातील गणेशभक्तांसाठी, चाकरमान्यांसाठी गणेशोत्सव म्हणजे उत्सवाची पर्वणीच असते. लाखो कोकणवासी गणेशोत्सव काळात गावी, कोकणात जाऊन गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात. त्यामुळेच, यंदाही कोकणातील गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफी करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबतची माहिती दिली. त्यासाठी, गणेश भक्तांना पास मिळवण्यासाठी यंत्रणाही उभी करण्यात येत आहे.

यंदाच्या गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. 23 ऑगस्ट ते 8 सप्टेंबर या कालावधीत मुंबई-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील टोल नाक्यांवर गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या वाहनांना आणि एसटी बसेसना टोलमाफी मिळणार आहे. त्यासाठी “गणेशोत्सव 2025 – कोकण दर्शन” या नावाचे विशेष टोलमाफी पास देण्यात येणार असून त्यावर वाहन क्रमांक व वाहन मालकाची माहिती नोंदवली जाईल.

गणेशभक्तांना हे पास संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी, पोलीस व वाहतूक विभागाकडे उपलब्ध असतील. परतीच्या प्रवासासाठी देखील हेच पास ग्राह्य धरले जाणार आहेत. शासनाच्या आदेशानुसार ग्रामीण व शहरी पोलीस तसेच प्रादेशिक परिवहन विभागाने ते पास वाटपाचे समन्वय साधून प्रवाशांना वेळेत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचनाही एकनाथ शिंदेंनी दिल्या आहेत. तसेच या संदर्भात जाहीरात व सूचना प्रसिद्ध करून जनतेला माहिती देण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.दरम्यान, राज्य सरकारचा हा निर्णय कोकणात जाणाऱ्या लाखो भाविकांच्या प्रवासाला मोठा दिलासा ठरणार आहे. तसेच, गणेशभक्तांचा उत्साह द्विगुणीत करणारा आहे. त्यामुळेच, गणपती बाप्पा मोरया... जयघोष आता कोकणला जाणाऱ्या मार्गावर पाहायला मिळेल.
दरम्यान, मुंबईतील कोकणवासीयांना गणेशोत्सवात आपल्या गावी येण्यासाठी कोकणातील नेते सोयी-सुविधा देत असतात. मंत्री नितेश राणे यांनीही गणेशोत्सवासाठी कोकणात गावी येणाऱ्यांसाठी विशेष रेल्वेसेवा देण्याचे सांगितले असून हा प्रवास मोफत असणार आहे. त्यामुळे, गणेशभक्तांचा प्रवास अधिक सुकर होईल.

# कल्याणमध्ये भीषण वाहतूक कोंडी

- दोन किमी अंतरासाठी चार ते पाच तासांचा कालावधी
- वाहन कोंडीत वाहन चालक,नागरिक त्रस्त

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पाऊस, खड्डे आणि धिम्या गतीने धावत असलेली वाहने यामुळे गुरूवारी दुपारपासून कल्याण शहर वाहन कोंडीत अडकत गेले आणि संध्याकाळी शहराचे वर्दळीचे, अंतर्गत रस्ते कोंडीने जाम झाले. या कोंडीत दोन दिवसांनंतर कामावर गेलेला नोकरदार आणि त्यांच्यासह शाळेचे विद्यार्थी अडकून पडले. वाहनांच्या लांब रांगा, कर्णकर्कश भोंग्यांनी रस्तोरस्ती गजबजाट - होता. कल्याणमधून प्रेम ऑटो भागातून उल्हासनगर, शहाड येथे जाण्यासाठी प्रवाशांना दोन तासाचा कालावधी लागत होता.

कल्याण शहराची या कोंडीतून सुटका होईल कधी, असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहेत. पालिका, वाहतूक पोलीस, आरटीओ अधिकाऱ्यांनी या कोंडीवर उपाय करण्यासाठी फक्त वेळोवेळी बैठका घेतल्या. या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने त्याचा फटका प्रवाशांना बसत आहे. या कोंडीत कल्याण शहरातील नागरिक, व्यापारी सर्वाधिक अडकून पडत आहेत. अनेकजण या सततच्या कोंडीला कंटाळुन आपला व्यवसाय अन्य शहरात करण्याचा विचार करत आहेत. गुरुवारी दुपारपासून शहाड उड्डाण पूल, वालधुनी, प्रेमऑटो, मुरबाड रस्ता, संतोषी माता रस्ता भागात



वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या. या कोंडीतून मार्ग काढण्यासाठी मोटार, दुचाकी चालकांनी अंतर्गत रस्त्याने पुढे जाण्याचा प्रयत्न केला. अगोदरच शहरातील मुख्य रस्ते वाहनांनी जाम होते. त्यात अंतर्गत अरूंद रस्त्यावर वाहने आल्याने शहरातील रस्ते कोंडीत अडकले.
या कोंडीत शाळेच्या बस अडकून पडल्याने विद्यार्थ्यांचे हाल झाले. गणेशोत्सवाची खरेदी करण्यासाठी परिसरातील नागरिक, व्यापारी कल्याण शहरात येत आहेत. त्यांना कोंडीचा फटका बसला. गणेशोत्सव तोंडावर आला आहे. तत्पूर्वी या कोंडीवर उपाययोजना करण्याऐवजी पालिका प्रशासनातील अधिकारी दालनातील दिवसभराच्या बैठकांमध्ये व्यस्त असल्याची टीका होत आहे. वाहनांच्या तुलनेत वाहतूक पोलीस, वाहतूक सेवक पुरेशा प्रमाणात नाहीत. अलीकडे नव्याने भरती केलेले नवतरूण वाहतूक सेवक वाहतूक नियोजनाचा अनुभव नसल्याने चौक, रस्त्याच्या कोपऱ्यावर उभे राहून वाहतूक कोंडी होईपर्यंत आपल्या व्हॉट्सपमध्ये मग्न असतात. पर्यावरणस्नेही उपक्रमासाठी दिवसरात्र काम करणाऱ्या कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने वाहन कोंडीमुळे ध्वनी, हवेतील प्रदूषण होत आहे याची जाणीव ठेऊन शहरातील वाहतूक कोंडी सोडविणे हे आपलेही काम हा विचार करून वाहतूक विभाग, आरटीओ यांना विचारात घेऊन गणेशोत्सवापूर्वी शहरातील वाहतूक सुस्थितीत होईल याकडे लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## शाळांची संचमान्यता विद्यार्थ्यांच्या आधारावर आधारित




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील शाळांना मिळणारी संचमान्यता आता थेट विद्यार्थ्यांच्या आधार पडताळणीवर अवलंबून राहणार आहे. शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयामुळे आधार कार्ड अपूर्ण किंवा न जुळलेल्या विद्यार्थ्यांना पटसंख्येतून वगळले जाणार आहे. परिणामी राज्यातील तब्बल 5 लाख 24 हजार विद्यार्थ्यांनी अजून आधार नोंदणी क्रमांक दिलेलाच नाही यामुळे हे विद्यार्थी शाळेत असूनही नोंदणीबाह्य ठरण्याची भीती आहे. महिनाभरात या विद्यार्थ्यांची नोंदणी पूर्ण न झाल्यास याचा फटका थेट संचमान्यतेला बसून हजारो शिक्षक अतिरिक्त होण्याची वेळ येणार आहे.

राज्यातील शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंद करण्यासाठी दिलेल्या युडायस प्लस पोर्टलवर आधार कार्ड वैध असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या लक्ष घेऊन संचमान्यता करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यामुळे काही कारणांमुळे आधार कार्ड नसलेले किंवा ज्यांची आधार कार्ड वैध ठरणार नाहीत, असे विद्यार्थी शाळांमध्ये उपस्थित असूनही अवैध ठरणार आहेत.
30 सप्टेंबरपर्यंत पटावर नोंद झालेल्या विद्यार्थ्यांपैकी आधार कार्ड वैध असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊनच संचमान्यता करण्यात असल्याचे शिक्षण संचालनालयाकने परिपत्रक काढून अगोदरच माहिती दिली आहे.

राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या आकडेवारीनुसार राज्यभरात एकूण 1 कोटी 99 लाख 28 हजार 780 विद्यार्थी नोंदणीकृत आहेत. यापैकी 5 लाख 24 हजार 481 विद्यार्थ्यांनी अजून आधार क्रमांक दिलेला नाही. तर 5 लाख 94 हजार 073 विद्यार्थ्यांची आधार पडताळणी प्रलंबित आहे. याशिवाय 2 लाख 96 हजार 493 विद्यार्थ्यांची पडताळणी फेल झाली आहे.
दरम्यान, 1 कोटी 85 लाख 13 हजार 733 विद्यार्थ्यांची पडताळणी वैध ठरली आहे. यामधील 1 कोटी 82 लाख 90 हजार 224 विद्यार्थ्यांची नावे आधार नोंदनीशी जुळली असून 1 कोटी 76 लाख 19 हजार 548 विद्यार्थ्यांची पूर्णपणे पडताळणी पूर्ण झाली आहे.

### शिक्षक संघटनांचा आक्षेप

महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेचे अध्यक्ष तानाजी कांबळे म्हणाले की, विद्यार्थी वर्गात बसून शिकत असताना, फक्त तांत्रिक कारणावरून त्याला अमान्य करणे हा शिक्षणहक्क कायद्याचा भंग आहे. हजारो विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येईल आणि शेकडो शिक्षक अतिरिक्त ठरतील. शासनाने या अटीत सवलत दिली पाहिजे.महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महासंघाचे माजी उपाध्यक्ष महेंद्र गणपुले यांनी सांगितले की, आधार पडताळणीची जबाबदारी शासनाची आहे. विद्यार्थी प्रत्यक्ष शिकत असूनही त्याला पटसंख्येबाहेर काढणे म्हणजे फक्त आर्थिक बचतीसाठी विद्यार्थ्यांचे अस्तित्व नाकारणे होय. हा शिक्षणहक्क कायद्याचा अवमान आहे.

## राज ठाकरे फडणवीसांची भेट

### राजकीय गोटात चर्चांना उधाण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता


मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे आज (दि.२१) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी वर्षा निवासस्थानी पोहोचले. या भेटीची माहिती समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. बेस्ट कर्मचारी सोसायटी निवडणूकीत ठाकरे ब्रँड चालला नाही, त्यानंतर राज ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे आज (दि.२१) सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी गेले आहेत. फडणवीस यांची भेट घेण्यासाठी ते त्यांच्या वर्षा निवासस्थानी पोहचले आहेत. अलीकडेच झालेल्या बेस्ट निवडणुकीत 'ठाकरे' ब्रँड चालला नसल्याचे दिसून आले होते. त्यानंतर लगेचच राज ठाकरे वर्षा निवासस्थानी गेल्याने विविध राजकीय तर्क-वितर्कांना ऊत आला आहे. तर गणपतीनिमित्त घरी येण्याचे आणि महाराष्ट्रातील पूर स्थितीबाबत बोलण्यासाठी राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी गेल्याची माहिती देखील समोर आली आहे.
आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चाही सुरू असताना, राज ठाकरे आणि फडणवीस यांची भेट राजकीय समीकरणांमध्ये नवे रंग भरू शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या भेटीमुळे मनसेच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत नवे संकेत मिळू शकतात. ठाकरे ब्रँडच्या अलीकडील अपयशानंतर राज ठाकरे कोणत्या नव्या राजकीय समीकरणांकडे वळतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजप आणि मनसेमधील संबंध पुन्हा दृढ होणार का, यावरही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी झालेली भेट केवळ नागरिकांच्या प्रश्नापुरती मर्यादित राहते की, ती महाराष्ट्राच्या आगामी राजकीय समीकरणांना नवा वळण देते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## फळेगावमध्ये मृत देहाला ‘एनडीआरएफ’चा आधार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : उल्हास, काळू नद्या दुथडी भरून वाहत असल्याने टिटवाळा परिसर जलमय झाला. नागरी जीवन विस्कळीत झाले. अशा परिस्थितीत टिटवाळा जवळील फळेगावातील एका पुनर्वसन केंद्रातील महिलेचा वयोमानाप्रमाणे नैसर्गिक मृत्यू झाला होता. फळेगाव भागातील स्मशानभूमी पुराच्या पाण्याने वेढलेली. अशा परिस्थितीत या महिलेवर अंत्यसंस्कार कसे करायचे असा प्रश्न निर्माण झाला होता. यावेळी देवदत्तासारखी उभी राहिली कल्याण भागातील राष्ट्रीय आपत्ती बचाव पथकाची टीम (एनडीआरएफ).
राष्ट्रीय आपत्ती बचाव पथकाच्या (एनडीआरएफ) टीमने केलेल्या या कामाबद्दल सर्वस्तरातून समाधान व्यक्त केले जात आहे. या पथकाने



टिटवाळ्या जवळील पुराच्या पाण्याने वेढलेल्या फळेगाव भागात जाऊन पुनर्वसन केंद्रात नैसर्गिकरित्या मृत महिलेला ताब्यात घेऊन तिला खांदा दिला. महिलेचे पार्थिव ट्युबच्या बोटीवर ठेऊन हे पार्थिव पाच ते सहा फुटाची पाण्याची पातळी असलेल्या पाण्यातून व्हल्वत फळेगावच्या स्मशानभूमीत सुस्थितीत नेले. तेथे तिच्यावर आपल्या कुटुंबातील एक सदस्य गेली या भावनेतून केंद्र चालकांच्या उपस्थितीत त्या महिलेवर अंत्यसंस्कार केले. फळेगाव मधील एका पुनर्वसन केंद्रातील महिलेचा नैसर्गिक मृत्यू झाला आहे. या महिलेचे अंत्यसंस्कार करण्यात येत असलेली स्मशानभूमी मंगळवार पासून पुराच्या पाण्याच्या वेढ्यात आहे. त्यामुळे पुनर्वसन केंद्रातील मृत महिलेच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करता येत नसल्याची माहिती कल्याणचे तहसीलदार सचिन शेजाळ यांना मिळाली. तहसीलदार शेजाळ यांनी तातडीने एनडीएआरएफच्या कल्याण पथकाला ही माहिती दिली. तहसीलदार शेजाळ यांच्या सूचनेवरून एनडीआरएफचे पथक बुधवारी तात्काळ फळेगाव येथे पोहचले. त्यांनी पुनर्वसन केंद्रातील कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. घरात महिलेच्या पार्थिवावर आवश्यक ते अंत्येष्टीचे विधी पुनर्वसन केंद्रातील कर्मचाऱ्यांकडून करण्यात आले. त्यानंतर पार्थिवाचा एनडीआरएफच्या पथकाने ताबा घेतला. महिलेचे पार्थिव एक चादरीत गुंडाळण्यात येऊन तिरडीवर ठेवण्यात आले. फळेगावातील पुनर्वसन केंद्र ते स्मशानभूमी दरम्यानच्या रस्त्यावर पाणी साचले होते. या पाण्यातून स्मशानभूमीपर्यंत पार्थिव घेऊन जाणे ग्रामस्थ, पुनर्वसन केंद्रातील कर्मचाऱ्यांना शक्य नव्हते. एनडीआरएफने खांदा देऊन पार्थिव आपल्या जवळील ट्युबच्या बोटीत ठेवले. बोटीतून पार्थिव स्मशानभूमीपर्यंत नेण्यात आले. एनडीआरएफ पथकाच्या साहाय्याने स्मशानभूमीत पुनर्वसन केंद्रातील कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत महिलेच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.







## डोंबिवलीत कॉंग्रेसला खिंडार

### कॉंग्रेसच्या माजी नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कॉंग्रेसच्या डोंबिवलीमधील माजी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या पक्ष प्रवेशानंतर कॉंग्रेसमधील पदाधिकाऱ्यांनी आपली खदखद व्यक्त केली आहे. कल्याणमधील माजी आमदारांनी कॉंग्रेसची परिस्थिती गंभीर करून ठेवली आहे असा थेट आरोप त्यांनी पक्षातील वरिष्ठांवर केला आहे. भाजपाचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत डोंबिवली कॉंग्रेसमधील माजी नगरसेवकांनी गुरुवारी (ता.21) भाजप पक्षात प्रवेश केला. यामुळे कॉंग्रेसला डोंबिवलीमध्ये मोठे खिंडार पडले आहे. आगामी पालिका निवडणुका लक्षात घेता पक्ष फोडाफोडीचे




राजकारण सुरु झाले आहे. भाजप आणि शिवसेना शिंदे गटात पदाधिकारी पक्ष प्रवेश करत आहेत. कल्याण डोंबिवलीमध्ये कॉंग्रेसचे चार नगरसेवक असून त्यातील 3 डोंबिवलीमध्ये आहेत.
पदाधिकाऱ्यांच्या या पक्ष प्रवेशानंतर कॉंग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव संतोष केणे यांनी आपली नाराजी उघड केली आहे. विधान परिषदेचे माजी आमदार संजय दत्त यांच्यावर केणे यांनी गंभीर आरोप केले आहेत. कल्याण डोंबिवलीमधील कॉंग्रेसची परिस्थिती एका डायनोसोरने गंभीर करून ठेवली आहे. तो डायनोसोर दिल्लीत जाऊन बसला आहे. त्यांनी कधीही पक्ष संघटनेवर लक्ष दिलं नाही. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे सदस्य होण्यासाठी लागणारे आठ प्रदेश प्रतिनिधी निवडीसाठी केवळ त्यांनी आतापर्यंत प्रयत्न केले आहेत. या व्यतिरिक्त पक्षासाठी त्यांनी काही केलेलं नाही.
तीन वेळा त्यांना विधानपरिषद दिली, तरी सुद्धा त्यांनी पक्ष संघटना बांधली नाही. कल्याणच्या पक्ष कार्यालयासाठी जो निधी दिला तो सुद्धा त्यांनीच खाऊन टाकला असा दावा देखील केणे यांनी केला आहे. यामुळे आता संतोष केणे पक्षावर नाराज असल्याची चर्चा सुरु झाली आहे. नाराज केणे सुद्धा पक्ष सोडणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे येत्या पालिका निवडणुकीपूर्वी कॉंग्रेसला आणखी मोठा धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# एक मेसेज व्हॉट्सॲपचा... तुमच्या समाधानाचा

## जिल्हाधिकारी कार्यालयाचा व्हॉट्सॲप नंबर तक्रार निवारण उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ठाणे : जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी "एक मेसेज व्हॉट्सॲपचा.. तुमच्या समाधानाचा..." या उपक्रमाचा प्रभावीपणे वापर करून नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पाऊल उचलले आहे. 9930001185 हा तो व्हॉट्सॲप क्रमांक असून नागरिकांना या क्रमांकावर आपली तक्रार नोंदविता येणार आहे.

भारताच्या 79 व्या स्वातंत्र्यदिनी दि.15 ऑगस्ट 2025 रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नागरिकांच्या तक्रार व अडीअडचणी तात्काळ सोडविण्यासाठी व्हॉट्सॲप नंबर तक्रार निवारण उपक्रमाचे अनावरण उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

तरी, जिल्ह्यातील नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

# ठाणे महापालिका मुख्यालयात सद्भावना दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांचा जयंतीदिन हा देशभरात सद्भावना दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने, ठाणे महापालिका मुख्यालयात कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांच्या प्रतिमेला अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर, सद्भावना दिनानिमित्त प्रतिज्ञाही घेण्यात आली. यावेळी महिला व बालविकास अधिकारी दयानंद गुंडप, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर तसेच महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

## श्रावण मासानिमित्त आयोजित

# भजन महोत्सवाची यशस्वी सांगता

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड विधानसभेचे आमदार किसनराव कथोरे यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली 25 जुलै 2025 पासून भगवान श्री शंकराचे पुरातन मंदिर असलेल्या श्रीक्षेत्र संगमेश्वर येथे श्रावणमासा निमित्त सुरू झालेल्या भव्य भजन महोत्सवाची आज यशस्वी सांगता झाली.

आमदार किसन कथोरे हे शिव शंकराचे परम भक्त आहेत. त्यांची परम निष्ठा व भक्ती आहे.त्याच अनुषंगाने त्यांनी संगम तिर्थक्षेत्राचा भव्य, सुंदर व आकर्षक असे सुशोभीकरण करण्याचे योजिले आहे.लवकरच या कामाचा शुभारंभ होणार आहे. यावर्षी प्रथमच श्रावण मासा निमित्त हरिनामाचा गजर व्हावा यासाठी संगम येथे तालुक्यातील भजन मंडळाचे दररोज संध्याकाळी भजनाचे कार्यक्रम आयोजित करून मतदार संघात एक वेगळा भक्तीमय सोहळयाचा पायंडा निर्माण केला आहे.



या भव्य भजन महोत्सव सोहळयाचे नियोजन टि.डी.बँकेचे संचालक राजेश पाटील, मुरबाड भाजपा पूर्व मंडळाचे अध्यक्ष दिपक पवार, पश्चिमचे अध्यक्ष जितेंद्र भावार्थे यांनी केले असून आज त्याची सांगता मुरबाड भुषण संगित विषारद वैभवबुवा मंडलिक यांच्या सुमधुर भजनाने व संत महंतांच्या उपस्थितीत करण्यात आली.

या सांगता सोहळयासाठी मुरबाडचे तहसीलदार अभिजीत देशमुख,बँकेचे संचालक राजेश पाटील , मा.जि.प.सदस्य उल्हास बांगर, शिवसेना तालुका प्रमुख कांतीलाल कंटे,ह.भ.प. आत्माराम सासे, बाजार समितीचे संचालक सुरेश बांगर, खरेदी विक्री संघाचे चेअरमन संतोष पवार,युवा नेते अनिल घरत, गणेश कथोरे,अनिल वायले, मा.नगराध्यक्ष मुकेश विशे, मा.सभापती स्वरा चौधरी, नगरसेविका मधुरा सासे, सिमा घरत, हर्षला भोईर, जयवंत कराळे, आण्णा शिंगोळे, मनोज देसले, शहापूर भाजपाचे अशोक इरनक, तुकाराम भाकरे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक,भजन प्रेमी उपस्थित होते.

# पोलिस ठाण्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पदाधिकाऱ्यांची बैठक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद ग्रामीण(नरेंद्र पाटील) : येथील पोलिस ठाण्या अंतर्गत असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पदाधिकारी यांच्याशी समन्वय साधण्यासाठी वाशिंद ग्रामपंचायत येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



पुढील आठवड्यात गणेशोत्सव उत्सव सुरू होत आहे. या अनुषंगाने शहापूर पोलिस उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तर पोलिस निरीक्षक सचिन हुंदळेकर यांच्या नेतृत्वाखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. वासिंद पोलिस ठाण्या अंतर्गत 34 गांव असून यामध्ये 30 सार्वजनिक तर 1 हजार 20 घरगुती (खाजगी) गणपती बाप्पांचे आगमन होत आहे.

सदर बैठकीत ऑनलाईन परवानगी, मंडप, स्पिकर यांसह गणपती स्थापना ठिकाणी अनुचित प्रकार घडू नये यासाठी मंडळाचे पदाधिकारी, सदस्य यांनी योग्य देखरेख व कार्यरत रहावे, आजूबाजूतील नागरीकांना त्रास होऊ नये याची दक्षता घ्यावी, डॉल्बी, जुगार खेळणे बंदी अशा आदी शासनाने आदेश दिलेल्या नियमांचे पालन करून भक्तीमय वातावरण ठेवावे असे संवाद साधून सुचना करण्यात आल्या असल्याचे पोलिस निरीक्षक सचिन हुंदळेकर यांनी म्हटले आहे.

दरम्यान, मंडळाशी समन्वय साधण्यासाठी पोलिस ठाण्यातून प्रत्येक मंडळासाठी एक पोलिस अंमलदार नेमलेले असून प्रत्येक मंडळ पदाधिकारी व नागरिकांनी दिलेल्या आदेशाचे पालन करावे व काही अडचण किंवा अनुचित प्रकार, घटना घडल्यास त्वरित पोलिस ठाण्यात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# ठाणे शहरात काही दिवस अनियमित पाणीपुरवठा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : सलग तीन दिवस भातसा धरण क्षेत्रात होत असलेल्या अतिवृष्टीमुळे ठाणे महापालिकेच्या पिसे पंपिंग स्टेशन येथील नदीपात्रामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ, कचरा, व झाडांच्या फांद्या जमा झाल्या आहेत. नदीपात्रात पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने पिसे पंपिंग स्टेशनमध्ये पाणी शिरले आहे. त्यामुळे या पंपिंग स्टेशनवर पूर्ण क्षमतेने पंपिंग होण्यात अडथळे येत आहेत. तसेच, पाण्याच्या गढूळपणामुळे शुद्धीकरणाच्या प्रक्रियेवरही परिणाम होत आहे. या सर्व परिस्थितीमुळे ठाणे शहराकडे येणारा पाणीपुरवठा सुमारे २५ टक्के कमी झाला आहे.



**पंपिंग स्टेशनमध्ये येत असलेल्या गाळामुळे पंपिंग क्षमतेवर झाला परिणाम पाणी गाळून पिण्याचे आवाहन**

पंपाच्या स्टेनरमधील गाळ काढण्याचे काम करण्यात येत आहे. त्यामुळे शहरामध्ये पुढील काही दिवस अपुऱ्या प्रमाणात व अनियमित पाणीपुरवठा होईल, याची नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी. तसेच, या काळात पाणी उकळून प्यावे आणि पाण्याचा वापर जपून करावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

# इन्फिगो आय केअर हॉस्पिटलवर कारवाई करा

## राहुल हिंदुराव यांची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(दिलीप पवार) : मुरबाड शहरात कल्याण- मुरबाड हायवे लगत सोनारपाडा येथे डोळयांच्या उपचारासाठी प्रसिद्ध असलेल्या इन्फिगो आय केअर हॉस्पिटलवर रूग्णाची फसवणूक झाली असल्याने हॉस्पिटलची चौकशी करून कारवाईची मागणी पेशंटच्या नातेवाईकांनी लेखी तक्रारीद्वारे केली आहे.




याबाबत सविस्तर वृत्त असे की मुरबाड शहरात गेले अनेक वर्ष इन्फिगो आय केअर सेंटर मध्ये डोळयांच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. त्या अनुषंगाने न्हावे येथिल रहिवासी राहुल सुरेश हिंदुराव यांनी आपली आई कल्पना सुरेश हिंदुराव वय -57 वर्ष हिला डोळयाची शस्त्रक्रिया करण्यासाठी इन्फिगो आय केअर सेंटर मध्ये दाखल केली. शस्त्रक्रिया करण्यासाठी खर्च कीती व कोणत्या प्रकारची लेन्स बसवणार याबाबत राहुल हिंदुराव यांनी हॉस्पिटलच्या रिसेप्शन कडे सविस्तर चर्चा केली व एकुण खर्च 39000 येईल व तुम्हांला "मेड इन इंडिया" कंपनीची लेन्स आईच्या डोळयाला बसवून दिली जाईल असे सांगण्यात आले. परंतु प्रत्यक्ष शस्त्रक्रिया झाल्या नंतर मुलगा राहुल हिंदुराव यांनी डॉक्टरांकडे तुम्ही कोणती लेन्स बसवली आहे त्याचा बॉक्स मला द्या अशी मागणी केली. परंतु शस्त्रक्रिया केलेले डॉक्टर तो बॉक्स दाखविण्यास तयार नव्हते .नंतर बराच वेळाने अखेर डाक्टरांनी जो बॉक्स दाखविला तो मेड इन यू.एस.ए.म्हणजे परदेशी बनावटीचा होता. म्हणजे राहुल हिंदुराव यांच्या म्हणण्यानुसार या हॉस्पिटलचे डॉक्टर पेशंटची चक्क फसवणूक करत असून पेशंटला हलक्या दर्जाची लेन्स वापरून जिवाशी खेळत आहेत. याबाबत त्यांनी डॉक्टरांकडे विचारणा केली असता सुरूवातीला खुलासा देण्यासाठी पुढे येत नव्हते व नंतर सारवा सारव केली असल्याने डॉक्टरांनी केलेल्या या फसवणुकी विरोधात त्यांनी तालुका आरोग्य अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना लेखी तक्रार केली असून माझ्या आई सारख्या अनेक माय- माऊलींची,जेष्ठ नागरिकांची या ठिकाणी फसवणूक झाली असावी म्हणून संबंधित हॉस्पिटल व डॉक्टरांची चौकशी करून मेडिकल ॲक्ट नुसार कठोर कारवाईची मागणी राहुल हिंदुराव यांनी केली आहे.

दरम्यान घडलेल्या प्रकारा बाबत शस्त्रक्रिया केलेल्या डॉक्टरांशी याबाबत विचारणा केली असता आम्ही कोणतीही फसवणूक केलेली नसून बसवलेली लेन्स ही उत्तम दर्जाची आहे. फक्त कंपनी चे नाव जरी वेगळे असले तरी ती लेन्स इंडियनच आहे असे स्पष्टीकरण हॉस्पिटलच्या वतीने देण्यात आले.

# ओतूर परिसरात पावसाची संततधार सोयाबीनला जीवदान

## शेतकऱ्यांचा आनंद द्विगुणीत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : तब्बल महिनाभर पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत होती. माळशेज परिसरातील ओतूर, रोहोकडी, आंबेगव्हाण, पाचघर, अहिनवेवाडी, उदापूर, डिंगोरे, नेतवड, धोलवड, ठीकेकरवाडी आदी गावांमध्ये शेतकरी अक्षरशः आकाशाकडे डोळे लावून बसले होते. दरम्यान, दोन आठवड्यांपासून सतत ढगाळ वातावरण असले तरी पावसाचा थेंबही पडत नव्हता. यामुळे सोयाबीन, भात यांसारख्या पिकांच्या स्थितीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.



मात्र मंगळवार दि. १९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास पावसाने हजेरी लावली. सुरुवातीला हलका तर नंतर सतत रिमझिम असा पाऊस कोसळू लागला. बुधवारपर्यंत हा पाऊस कायम राहिल्याने शेतकऱ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे. पावसामुळे पिकांची चांगली सजवणी झाली असून सोयाबीन पिकाला विशेष जीवदान मिळाले आहे. गेल्या काही दिवसांपासून कोमेजलेल्या पिकांना हिरवी कुस उमलल्याचे दृश्य शेतशिवारात दिसू लागले आहे.

पावसामुळे डोंगरदऱ्यांतून पाण्याचे ओघ मोठ्या प्रमाणात वाहू लागले आहेत. ओढे, नाले, लहान-मोठ्या नद्यांना पाणी मिळाल्याने परिसरात नवचैतन्य पसरले आहे. विहिरी, पाझर तलाव भरू लागल्याने पुढील पेरणी व पिकांना आवश्यक तितके पाणी उपलब्ध होईल अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

पावसाच्या या सततच्या धारांनी शेतकऱ्यांचा आत्मविश्वास परतला असून आगामी खरीप हंगामाची आशा बळावली आहे. "हा पाऊस आणखी काही दिवस चालू राहिला तर यंदाचा हंगाम नक्कीच बंपर होईल," अशी आशावादी प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत. ग्रामीण भागात सर्वत्र शेतकरी बांधवांच्या चेहऱ्यावर समाधानाची हास्यरेषा उमटलेली दिसत आहे.

# 'नव्या जगाचे पालकत्व' सोबती संस्थेचा स्तुत्य उपक्रम - डॉ तुषार पाटील

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण एज्युकेशन सोसायटीची आणि सोबती संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भाऊसाहेब नेने सभागृहात नव्या जगाचे पालकत्व या विषयावर पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेतील लहान मुलांसाठी मानसोपचार तज्ञ डॉ.तुषार पाटील यांचे पालक व शिक्षक यांच्यासाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला सोबती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड बापुसाहेब नेने,पेण एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष ॲड.मंगेश नेने, उपकार्याध्यक्ष संजय कडू, संचालिका डॉ.निता कदम प्रशासकीय अधिकारी दिगंबर चिंचणीकर, मुख्याध्यापिका सौ.लेखा ठाकूर सौ रोहिणी म्हात्रे ,सोबती संस्थेचे सभासद शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आदि मान्यवर उपस्थित होते.

सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी बोलताना डॉ तुषार पाटील यांनी सांगितले की पालकांनी मुलांना आवडणारे खेळ, वाचन, संवाद, मोबाईलचे दुष्परिणाम मुलांचा हट्ट मुलांसोबत एकत्र राहून संभाषण करणे,मुलांचे मित्र बनणे, मुलांच्या चांगल्या वाईट सवयीची माहिती घेणे, आपलं मूळ इतरांपेक्षा वेगळा आहे का याची चाचपणी करणे एवढेच काय तर मुलांच्या आवडीनिवडी त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयी त्यांना दिले जाणारे योग्य संस्कार त्यांच्या मनातील भीती दूर करणे मुलांना लहानपणापासूनच मोबाईल पासून दूर कसं ठेवता येईल यासाठी आई-वडिलांनी आपल्या घरापासूनच प्रयत्न करणे गरजेचे आहे. मुलांचा अभ्यास त्याचे आचार विचार आदी विषयावर सखोल मार्गदर्शन करून मुलांच्या आणि आई-वडिलांच्या मनात निर्माण होणारे प्रश्न यांची सांगड कशाप्रकारे घालायची त्यातून मार्ग कसा काढायचा याविषयी सखोल मार्गदर्शन मानसोपचार तज्ञ डॉ. तुषार पाटील यांनी केले. पालकांनी विचारलेल्या प्रश्नाला सकारात्मक उत्तरे देऊन पालकांच्या शंकांचे निरसन केले आणि त्यांच्या मनामध्ये असलेली मुलांविषयी भीती दूर करण्यासाठी काय नक्की केलं पाहिजे यासाठी संभाषण संवाद याला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचेही सांगितले. यावेळी विविध प्रात्यक्षिके घेऊन मुलांचे प्रश्न कसे सोडवता येतील हे दाखवले.

> **नव्या जगाचे पालकत्व हा उपक्रम सोबती संस्थेने आणि पेण एज्युकेशन सोसायटीने हाती घेतला असून संस्थेच्या सर्व शाळांमध्ये हा उपक्रम राबवला जाणार असून तालुक्यातील विविध शाळांमध्ये देखील या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे त्याचबरोबर या उपक्रमाला जिल्ह्यातून मागणी आली तरी संपूर्ण जिल्हाभर सोबती संस्था या मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करेल असे सांगून जास्तीत जास्त पालकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.**
> — ॲड.मंगेश नेने,अध्यक्ष पेण एज्युकेशन सोसायटी

# गीतासार

**अध्याय १८**

**मोक्षसंन्यासयोगः**

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया । विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ १८-६३ ॥

अशा प्रकारे हे गोपनीयाहूनही अतिगोपनीय ज्ञान मी तुला सांगितले. आता तू या रहस्यमय ज्ञानाचा संपूर्णपणे चांगला विचार करून मग जसे तुला आवडेल तसे कर. ॥ १८-६३ ॥

सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः । इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ॥ १८-६४ ॥

सर्व गोपनीयांहून अतिगोपनीय माझे परम रहस्ययुक्त वचन तू पुन्हा ऐक. तू माझा अत्यंत आवडता आहेस, म्हणून हे परम हितकारक वचन मी तुला सांगणार आहे. ॥ १८-६४ ॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु । मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥ १८-६५ ॥

तू माझ्या ठिकाणी मन ठेव. माझा भक्त हो. माझे पूजन कर आणि मला नमस्कार कर. असे केले असता तू मलाच येऊन मिळशील. हे मी तुला सत्य प्रतिज्ञापूर्वक सांगतो. कारण तू माझा अत्यंत आवडता आहेस. ॥ १८-६५ ॥

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज । अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ १८-६६ ॥

सर्व धर्म म्हणजे सर्व कर्तव्यकर्मे मला अर्पण करून तू केवळ सर्वशक्तिमान, सर्वाधार अशा मला परमेश्वरालाच शरण ये. मी तुला सर्व पापांपासून सोडवीन. तू शोक करू नकोस. ॥ १८-६६ ॥

## आरोग्य

# हृदयविकाराची मुख्य कारणे



**मीठापासून बनवलेल्या वस्तू**

आरोग्य तज्ञांच्या मते, जास्त प्रमाणात मीठ सेवन हृदयरोग्यांसाठी हानिकारक असू शकते. खरं तर, जास्त मीठ खाल्ल्याने शरीरात पाणी साचते, ज्यामुळे रक्तदाब वाढू शकतो. उच्च रक्तदाबाचा थेट परिणाम हृदयावर होतो आणि त्यामुळे हृदयविकार किंवा स्ट्रोक होऊ शकतो. म्हणून, तुमच्या आहारात शक्य तितके कमी मीठ वापरा.

**जास्त साखरेचे सेवन**

आम्ही तुम्हाला सांगतो की, मीठाव्यतिरिक्त, साखरेचे जास्त सेवन हृदयासाठी देखील हानिकारक असू शकते, ज्यामुळे मधुमेह होतो. त्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो. म्हणून, तुमच्या आहारात शक्य तितक्या कमी साखरेचा वापर करा.

**मैद्याचे सेवन**

मीठ आणि साखरेव्यतिरिक्त, रिफाइंड मैद्याचे सेवन हृदयासाठी देखील हानिकारक आहे असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे, आरोग्य तज्ज्ञ पांढरे रिफाइंड मैदा न खाण्याचा सल्ला देतात.

# आजचे राशि भविष्य



**मेष**

दिवस काही बाबतीत विजय मिळवून देईल. राज्यकारभार आणि सत्तेचे पूर्ण लाभही मिळतील आणि तुमचा सन्मान वाढल्याने आनंदी व्हाल.

**वृषभ**

स्पर्धेची तयारी करणारे विद्यार्थी आपली तयारी सुरू ठेवतील.कुटुंबातील सर्व सदस्य आनंदी होतील. आरोग्याच्या बाबतीत तुम्हाला निरोगी वाटेल .

**मिथुन**

राजकारणाशी संबंधित लोकांना काही नवीन जबाबदाऱ्या मिळतील. धार्मिक कार्यात रस घ्याल. धार्मिक कार्यात श्रद्धेने आणि विश्वासाने पुढे जाल .

**कर्क**

आळशीपणामुळे दिवस तुमच्यासाठी कमकुवत असेल. कामाची गती मंद असेल, परंतु मित्रांसोबत संबंध चांगले राहतील, कुटुंबियांना आनंदी ठेवाल.

**सिंह**

तुमच्या जवळच्या व्यक्तीवर विश्वास ठेवल्याने समस्या निर्माण होऊ शकतात.जर तुम्ही विचारपूर्वक पुढे गेलात तर सर्व काही ठीक होईल.

**कन्या**

घरातील मोठ्यांची सेवाही कराल. आज तुम्हाला तुमच्या मेहनतीचे फळ नक्कीच मिळेल.मानसिक शांती मिळेल आणि तणावमुक्त कामही होईल.

**तूळ**

कामात उतावळेपणा टाळलात तर भविष्यातील समस्यांपासून तुमचे रक्षण होईल. तुम्हाला अनेक कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील.

**वृश्चिक**

काही महत्त्वाच्या चर्चेत भाग घेण्याची संधी मिळेल. तुमच्या भावनांची कदर केली जाईल, तुमचा प्रिय जोडीदार आज तुम्हाला भेटवस्तू देऊ शकतो.

**धनु**

एखाद्या नातेवाईकाला भेटायला जाणार.राजकारणाशी संबंधित लोकांना काही मोठे यश मिळेल. सामाजिक कार्यक्रमात जाण्याची संधी मिळेल.

**मकर**

विद्यार्थ्यांना शिक्षकांचे सहकार्य मिळेल. आगामी काळात तुमच्या महत्त्वाकांक्षा वाढतील आणि त्या पूर्ण करण्यासाठी तुम्ही कठोर परिश्रम कराल.

**कुंभ**

तुमच्यासोबत काम करणाऱ्या लोकांकडून तुम्हाला मदत मिळेल. आजचा दिवस तुमच्या व्यक्तिमत्त्वाला उंचावण्यासाठी चांगला आहे.कामाच्या बाबतीत

**मीन**

एखादा मित्र आर्थिक मदतीसाठी विचारू शकतो,क्षमतेनुसार मदत कराल. नोकरी करणाऱ्या लोकांना काही मोठे यश मिळाल्याने आनंद होईल.







# शहरांचे योग्य नियोजन करा नाही तर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना



लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

मुसळधार पावसाने मुंबईसह नवीमुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यात हाहाकार उडवला. मुंबई उपनगरात २४ तासात २३८.२ मिलिमीटर पाऊस झाला तर ठाणे शहरात १३३ मिलिमीटर पाऊस पडला. मुंबई शहरातही ११० मिलिमीटर इतका पाऊस झाला. कोकणातही पावसाने अशीच तडाखेबंद हजेरी लावली. केवळ मुंबई, ठाणे आणि कोकणच नव्हे तर संपूर्ण राज्यात पावसाने दाणादाण उडवली. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला. नाशिकमध्येही पावसाने कहर केला. विदर्भात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांना पावसाने तडाखा दिला तीच परिस्थिती मराठवाड्यातही झाली एकूणच पावसाने सपूर्ण राज्यात कहर केला. गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने असे रौद्ररूप धारण केले की सर्वांचीच पाचावर धारण बसली. या पावसाने मोठ्या प्रमाणात वित्तहानी तर झालीच पण काही ठिकाणी जीवितहानी देखील झाली. काहींना आपला जीव देखील गमवावा लागला. नद्या, नाल्यांना पूर आला. अनेकांचा संसार पाण्यात बुडाला, शेतीवाडी पाण्याखाली गेल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेल्याने बळीराजा हताश झाला. क्षणात होत्याचे नव्हते झाले. देशाची आर्थिक राजधानी असलेली आणि कधीही न थांबणारी मुंबईही या पावसाने काही काळ ठप्प झाली. या पावसाने मुंबईची पुन्हा एकदा तुंबई झाली. जोरदार पावसाने मुंबईचे जनजीवन विस्कळीत झाले. शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. पावसामुळे शासकीय आणि अशासकीय कर्मचाऱ्यांना देखील शासनाने सुट्टी दिली. जागोजागी पाणी तुंबल्याने रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले. लोकांच्या घरात पाणी आले. त्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. शेकडो गाड्या जाग्यावरच थांबल्या त्यामुळे महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली. काही ठिकाणी दरड कोसळल्याने महामार्ग बंद झाले. रेल्वे मार्गावर पाणी साचून रुळ पाण्याखाली गेल्याने लांब पल्ल्याच्या अनेक गाड्या रद्द कराव्या लागल्या. लांब पल्ल्याच्या गाड्याच नाही तर अनेक लोकलही रद्द कराव्या लागल्या. काही मार्गावर धीम्या गतीने लोकल सोडाव्या लागल्या. पावसाचे पाणी रेल्वे स्थानकावरून धबधब्याप्रमाणे ओसंडून वाहत होते. पावसामुळे रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. पावसामुळे तांत्रिक बिघाड झाल्याने मोनोरेल जाग्यावरच थांबली. त्यात शेकडो प्रवासी अडकले. आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशामक जवानांच्या पथकाने आपली जबाबदारी चोख पार पडल्याने प्रवाशांची सुरक्षित सुटका झाली. केवळ नशीब बलवत्तर होते म्हणूनच प्रवाशांचा जीव वाचला. या पावसाने २६ जुलै २००५ ला मुंबईत झालेल्या पावसाची आठवण करून दिली. त्यावेळी झालेल्या पावसात देखील मुंबईची अशीच अवस्था झाली होती. २६ जुलैच्या पावसानंतर आपण कोणताही धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. २६ जुलैला निसर्गाने शहरांचे योग्य नियोजन करा नाहीतर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना असा इशारा देऊन धडा शिकवला होता तरीही त्यातून आपण काहीही शिकलो नसल्याने दरवर्षी ये रे माझ्या मागल्या असेच चालू आहे. शहरीकरण करताना नागरी नियोजनाची आखणी न केल्याने शहरांच्या सीमा वाढत गेल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. नियोजनाचा आराखडा तयार न करता कागदावरील नकाशाच्या सीमा वाढवून महानगराची मांडणी करणारे शासन आणि प्रशासन याला जबाबदार आहे. मुबई पुण्यासारख्या मोठ्या शहरांच्या सीमा विस्तारित चालल्या आहेत. या शहरात दरवर्षी नव्या गावांची भर पडत आहे. नगर नियोजनाकडे गांभीर्याने न पाहता नागरीकरणाचा निर्णय घेतल्याने ही पूरस्थिती निर्माण झाली. शहरांच्या विस्तारण्याच्या शहरीकरणात पर्जन्यवाहिन्या, मलनिस्सारन अशा विविध विभागांचे एकत्रीकरण करून नियोजनाची मांडणी करण्याची प्राथमिकताही पूर्ण केली जाते का असाही प्रश्न निर्माण होतो. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद आणि एमएमआरडीए यांचा एकत्र मेळ बसत नसल्याने शहरांचे नियोजन कोलमडत आहे. उघडी गटारी, तुंबलेले नाले, अनधिकृत बांधकामे, अरुंद रस्ते, वाढती लोकसंख्या, सिमेंटची वाढती जंगले, सिमेंटची रस्ते, जागोजागी बसवलेली पेव्हिंग ब्लॉक्स या सर्वांचा एकत्रित परिपाक म्हणजे ही पूरस्थिती. सरकारने आतातरी जागे होऊन शहर नियोजनाचा योग्य निर्णय घ्यावा अन्यथा भविष्यात यापेक्षाही भीषण परिस्थितीला सामोरे जागे लागेल.

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/१७/मोप्र-१/दि.१८/१०/२०२३ चे प्रपत्र

**मृद व जलसंधारण विभाग**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग, कळवा, ठाणे. यांचे कार्यालय**
**कडा वसाहत, सहकार विद्यालयासमोर, जुना मुंबई -पुणे रोड, कळवा (प)**
दूरध्वनी क्रमांक 022-25428127 ई-मेल eemilsdnt@gmail.com

**ई-निविदा सुचना क्र.ब-१/२०/ सन २०२५-२६**

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा सीलबंद लिफाफ्यात मागवित आहेत.

निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**कामाचे नांव :- १) मौंजे वेडवहाळ (लोनल्याचा नाला) ता. शहापुर जि.ठाणे येथे गेटेड सिमेंट काँक्रीट बंधारा, बांधणे.**

| | |
|---|---|
| **निविदेची अंदाजित किंमत :-** | १) रु. ६१,०१,७७४/- |
| **ई-निविदा उपलब्ध कालावधी :-** | दिनांक : २२/०८/२०२५ ते दिनांक २९/०८/२०२५ |
| **ई-निविदा भरण्याचा कालावधी :-** | दिनांक : २३/०८/२०२५ ते दिनांक: ३०/०८/२०२५ |
| **ई-निविदा उघडणे :-** | दिनांक : ०१/०९/२०२५ (शक्य झाल्यास) |

खालील ठिकाणी ई-निविदा बाबतची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. संकेतस्थळ http://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचना मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल)
२. संकेतस्थळ जाहिरातीची माहिती http://www.cemilspn.in
३. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, ठाणे यांचे कार्यालयातील सुचना फलकावर.

**जा.क्र.जिजअ/मृवजवि/ठाणे/लेशा-१/ २५८०/२०२५**
**दिनांक :- १९.०८.२०२५**
**कार्यालय, जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे**

**सही /-**
**फरीद खान**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग कळवा-ठाणे**

## गणेशोत्सवाच्या अनुषंगाने वाडा पोलीस ठाण्यात सार्वजनिक मंडळांची समन्वय बैठक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



वाडा : २७ ऑगस्ट पासून गणपती विराजमान होणार असून त्या अनुषंगाने वाडा पोलीस ठाणे हद्दीत साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने सार्वजनिक गणेश मंडळ, पोलीस पाटील व सर्व संबंधित सरकारी विभाग प्रमुख यांच्या विशेष बैठकीचे आयोजन वाडा पोलीस ठाणे सभागृहात केले होते. बैठकीत सर्व मंडळांना पर्यावरण पूरक गणेश मूर्ती व देखाव्याचे मंडपात नियोजन करणे संदर्भात आव्हान करण्यात आले. तसेच गणेश मूर्तीचे मूर्ती कला केंद्र ते मंडपात आणण्यासाठीची व्यवस्था व सुरक्षितता या बाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच कोणाच्याही धार्मिक भावना दुखावतील असे देखाव्याचे विषय, चित्र, संदेश असू नये, कोणत्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची काळजी घेण्याचा सूचना दिल्या. समाज माध्यमांवर संदेशव्दारे अफवा पसरवून नये या बाबत कशी काळजी घ्यावी, गणेश मंडळाच्या वतीने गणेश मूर्ती स्थापनेपासून तर विसर्जन कालावधी पर्यंत मूर्ती, मंडप, विज, आग, नैसर्गिक आपत्ती आदी पासून दुर्घटना टाळण्यासाठी उपायोजनेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. गणेश मूर्ती स्थापन केल्यानंतर कोणत्याही प्रकारे भटकी जनावरे मूर्तीपर्यंत जाणार नाहीत यासाठी आपल्या मंडळाचे स्वयंसेवकांनी काळजी घ्यावी, मंडपामध्ये पूजेसाठी गर्दीच्या वेळी महिला व पुरुषांच्या वेगवेगळ्या रांगा लावण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले सदर गणेशोत्सवात ऑपरेशन सिंदूर, सायबर जनजागृती, बालविवाह प्रतिबंध, अंधश्रद्धा निर्मूलन, दारूबंदी व्यसन मुक्ती, शिक्षणाचे महत्त्व अशा विविध विषयांवरती देखावे तयार करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आगमन मिरवणूक व विसर्जन मिरवणूक दरम्यान डी.जे. बंदी असल्याचे सांगून त्या ऐवजी बँड पारंपरिक वाद्य यांचा वापर करण्याबाबत समज देण्यात आली. सर्व सार्वजनिक मंडळ यांनी एम.एस. सी. बी. यांच्याकडून नवीन मीटर परवानगी घेणेबाबत समज देण्यात आली. तसेच सर्व मंडळांना ऑनलाइन फॉर्म भरणे बाबत सुचित केले. सर्व मंडळाच्या अडीअडचणी ऐकून त्यांना योग्य त्या प्रकारे मार्गदर्शन व शकांचे निरासन करण्यात आले. सदर बैठकीस वाडा तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, वाडा पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे, वाडा नगरपंचायत मुख्याधिकारी मनोज पष्टे, वाडा सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजय डोंगरे, पोलीस पाटील, विविध मंडळाचे पदाधिकारी व नागरिक हजर होते.

## गणेशोत्सव कालावधीत राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वर १६ टनापेक्षा जास्त क्षमता असणाऱ्या वाहनांना बंदी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : दि.27 ऑगस्ट 2025 पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवाचे अनुषंगाने गणेशभक्त कल्याण, डोंबिवली, ठाणे, वसई, व मुंबई येथून मोठ्या प्रमाणावर कोकण व गोवा या भागात जाण्याकरिता खाजगी व प्रवासी वाहनांचा वापर करतात. त्यामुळे या कालावधीत दोन्ही (पुणे व कोकणमार्गे) मार्गावर प्रचंड प्रमाणात बाहतुकीची वर्दळ वाढते. याकरिता गणेशोत्सव कालावधीत राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 वर सर्व वाहने ज्यांची वजनक्षमता 16 टन किंवा 16 टनापेक्षा जास्त आहे. (जड-अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, लॉरी इ. वाहने) अशा वाहनाच्या वाहतुकीस पूर्णतः बंदी सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल निलेश धोटे यांनी लागू केली आहे.

दि.23 ऑगस्ट 2025 रोजी 00.01 वाजेपासून ते दि.28 ऑगस्ट 2025 रोजी रात्री 23.00 वाजेपर्यंत, दि. 31 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 08.00 वाजेपासून ते रात्री 23.00 वाजेपर्यत आणि दि. 02 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 08.00 वाजेपासून ते रात्री 23.00 वाजेपर्यंत तसेच दि. 06 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 08.00 नंतर ते दि. 07 सप्टेंबर 2025 रोजी 20.00 वाजेपर्यंत या कालावधीत मुंबई गोवा या राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 वर सर्व वाहने ज्यांची वजनक्षमता 16 टन किंवा 16 टनापेक्षा जास्त आहे. (जड-अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, लॉरी इ. वाहने) यांची वाहतुक पूर्णतः बंद करण्यात येणार आहे.

जेएनपीटी बंदर व जयगड बंदर येथून आयात निर्यात मालाची वाहतूक करणारी वाहने दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस सिलेंडर, मेडीसीन, लिक्वीड मेडीकल ऑक्सीजन, अन्न-धान्य, भाजी-पाला, नाशवंत माल इ. जीवन आवश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही. तसेच मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 च्या रस्ता रुंदीकरण/रस्ता दुरुस्ती कामकाज इ. साठी लागणारे साहित्य ने-आण करणाऱ्या वाहनांना बंदी लागू राहणार नाही. मात्र या संदर्भात वाहतूकदारांनी संबंधित वाहतूक विभाग/महामार्ग पोलीस यांच्याकडून प्रवेशपत्र घ्यावे असे त्यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

## मुसळधार पावसातही गोग्रासवाडी व कोपरखैरणे येथे निरंकारी भक्तांचे उत्स्फूर्त रक्तदान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : 'नरसेवा नारायण पूजा' ही निरंकारी मिशनची शिकवण जीवनात उतरवत डोंबिवलीतील गोग्रासवाडी आणि कोपरखैरणे येथे संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या दोन वेगवेगळ्या रक्तदान शिबिरांमध्ये एकंदर 325 निरंकारी भक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

मिशनच्या डोंबिवली झोन 35 ए अंतर्गत गोग्रासवाडी ब्रँचमार्फत आनंद दिघे सभागृह, गांधीनगर, डोंबिवली (पूर्व) येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये एकूण 174 निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले. त्यामध्ये 129 पुरुष तर 45 महिला रक्तदात्यांचा समावेश होता. या शिबिरामध्ये जे. जे. महानगर रक्तपेढी, मुंबई यांच्या मार्फत रक्त संकलन करण्यात आले. डोंबिवली झोनचे प्रभारी रावसाहेब हसबे यांच्या उपस्थितीत ईश्वराचे नामस्मरण करुन या शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे उपस्थित होते. सेवादल क्षेत्रीय संचालक जनार्दन म्हात्रे यांनीही उपस्थित राहून रक्तदात्यसांचा उत्साह वाढविला.

या शिबिरात गोग्रासवाडी बरोबरच आसपासच्या सागाव, आयरे गाव, नांदीवली आदि भागातील भक्तगणांनी मोठ्या उत्साहाने भाग घेत रक्तदान केले. स्थानिक मुखी जयदेव गायकवाड यांच्या देखरेखीखाली स्थानिक सेवादल युनिटच्या सहयोगाने या शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. तर संत निरंकारी मिशनच्या सानपाडा सेक्टर अंतर्गत कोपरखैरणे ब्रँचने ज्ञान विकास संस्था विद्यालय, येथे एक भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले ज्यामध्ये 151 रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

## तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये गॅस गळती

### ४ कामगारांचा गुदमरून मृत्यू, दोन जखमी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. कंपनीत गॅस गळती झाल्यानं चार कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला आहे, तर दोन जण बेशुद्ध आहेत, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीमधील मेडली फार्मासिटीकल कंपनीमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला आहे, तारापूर औद्योगिक वसाहतीमधील प्लॉट नंबर एफ 13 मध्ये ही कंपनी आहे. आज दुपारी अडीच ते तीन दरम्यान ही घटना घडली आहे.\

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, पालघर जिल्ह्यातल्या तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये ही दुर्घटना घडली आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीमधील प्लॉट नंबर एफ 13 मध्ये मेडली फार्मासिटीकल कंपनी आहे, या कंपनीमध्ये ही दुर्घटना घडली. वायू गळतीमुळे सहा कामगार बेशुद्ध झाले होते, त्यातील चार जणांचा गुदमरून मृत्यू झाला आहे, तर दोन जणांना तातडीनं येथील एका रुग्णालयात दाखल करण्यात आलं, सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आज दुपारी अडीच ते तीन वाजेदरम्यान ही घटना घडली आहे, दरम्यान हा अपघात नेमका कसा झाला, वायु गळतीचं नेमकं कारण काय आहे? हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेलं नाहीये.

मेडली फार्मा या कंपनीमध्ये असलेल्या नायट्रोजन रिएक्शन टँकमध्ये गॅस गळती झाल्याने हा अपघात घडला आहे. या दुर्दैवी घटनेत सहा व्यक्ती बेशुद्ध झाल्या होत्या, त्यातील चार जणांचा मृत्यू झाला असून, दोघांची परिस्थिती गंभीर आहे, त्यांना अतिदक्षता विभागात (ICU) मध्ये भरती करण्यात आलेले आहे. कल्पेश राऊत, बंगाली ठाकूर, धीरज प्रजापती आणि कमलेश यादव असं या दुर्दैवी घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांचं नाव आहे, तर रोहन शिंदे आणि निलेश हाडळ असं या अपघातामध्ये जखमी झालेल्या व्यक्तींची नाव आहेत, त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

**गॅस गळतीचं कारण अस्पष्ट**

दरम्यान ही गॅस गळती नेमकी कशी झाली? याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाहीये. या घटनेनं हळहळ व्यक्त केली जात आहे.

## पालघर मधील अतिवृष्टीचे पंचनामे करून तात्काळ नुकसानभरपाई द्यावी

### - आमदार विलास तरे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : पालघर जिल्ह्यासह वसई व पालघर तालुक्यासह बोईसर - तारापूर एम.आय.डी.सी मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित ग्रामस्थांच्या पुनर्वसन व तात्काळ मदतीसंदर्भात प्रभावी उपाययोजना करावी अशी जोरदार मागणी आमदार विलास तरे यांनी जिल्हाधिकारी इंदू राणी जाखड यांना निवेदन देऊन केली आहे.

यावेळी आमदार विलास तरे म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून पालघर जिल्ह्यासह वसई व पालघर तालुक्यात सतत झालेल्या अतिवृष्टीमुळे ग्रामीण व शहरी भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रामस्थांचे प्रचंड हाल झाले असून त्यांच्या उपजीविकेवर, आरोग्यावर व दैनंदिन व्यवहारांवर गंभीर परिणाम झाला आहे. सदर परिस्थितीत काही गंभीर समस्या निदर्शनास येत आहेत की, अनेक गावे व वस्त्यांमध्ये पाणी शिरल्यामुळे कच्ची घरे, झोपड्या तसेच घरगुती साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी ग्रामस्थांना आपली घरे सोडून सुरक्षित स्थळी जावे लागले आहे, पावसामुळे रस्ते वाहून गेल्याने आणि वाहतूक विस्कळीत झाल्याने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा खंडित झाला आहे. शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा नियमित न झाल्याने ग्रामस्थांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचल्याने भात, भाज्या, फळबागा व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. परिणामी शेतकरी वर्गावर आर्थिक संकट ओढावले आहे, पाणी साचून राहिल्याने डासांचे प्रमाण वाढले असून साथरोगांचा धोका गंभीर स्वरूप धारण करीत आहे. लहान मुले, वृद्ध व महिला यांचे आरोग्य विशेषतः धोक्यात आले आहे.

वरील परिस्थितीच्या अनुषंगाने विचार करता, आपल्यामार्फत बाधित ग्रामस्थांना शासकीय रेशन दुकानदारामार्फत अन्नधान्य, धान्य, डाळी, तेल इत्यादी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा, पूरग्रस्त कुटुंबांचे तात्काळ सर्वेक्षण करून त्यांना आवश्यक ते निवारा, कपडे व इतर वस्तू उपलब्ध करून द्याव्यात, शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे महसूल विभागामार्फत तातडीने करून त्यांना पीकविमा व आर्थिक मदत देण्यात यावी, आरोग्य विभागामार्फत बाधित भागात वैद्यकीय पथके तैनात करून आरोग्य शिबिरे भरवावीत व आवश्यक औषधांचा पुरवठा करावा, निचरा व स्वच्छतेच्या दृष्टीने ग्रामपंचायती व महानगरपालिकांसोबत समन्वय साधून नाले, गटारे व पाणी साचलेली ठिकाणे तातडीने स्वच्छ करावीत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत आपत्कालीन निधीचा वापर करून बाधितांना त्वरित आर्थिक मदत वाटप करण्यात यावी, बोईसर - तारापूर एम.आय.डी.सी मध्ये रस्ते सुधारणे व स्वच्छता करणे, आवश्यक असून तातडीने उपाययोजना करण्याबाबत यावी, अशी जोरदार मागणी आमदार विलास तरे यांनी जिल्हाधिकारी इंदूराणी जाखड यांच्या कडे केली आहे. पालघर जिल्हा व वसई-पालघर तालुका, बोईसर - तारापूर एम.आय.डी.सी. ही लोकसंख्येच्या दृष्टीने घनदाट असून सद्यस्थितीत अतिवृष्टीमुळे गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे बाधित ग्रामस्थांना तात्काळ दिलासा मिळावा यासाठी आपण तातडीने आवश्यक ती कार्यवाही करून जिल्हा प्रशासनामार्फत योग्य तो दिलासा द्यावा, असे ही आमदार तरे म्हणाले.



# धर्मवीर विचार मंचाचे उपोषण तिसऱ्या दिवशीही सुरूच

दै.ठाणे जीवनदीप वार्ता / मुंबई :

वाडा : धर्मवीर विचार मंचच्या वतीने वाडा तहसील कार्यालयासमोर सुरु केलेल्या उपोषणाचा आजचा तिसरा दिवस. मागण्या मान्य न झाल्याने उपोषण सुरूच आहे. वाडा तालुक्यातील विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी करता ऑफलाईन पद्धतीने वाडा तालुक्यातील विद्यालयातच प्रवेश मिळावा, अती उच्च दाब क्षमतेच्या विद्युत वाहिनी प्रकल्प खावडा IV C मध्ये बाधित जमीन क्षेत्राचा योग्य मोबदला दिला जात नाही तोपर्यंत सदरचे काम बंद ठेवावे, चिंचघर - बुधावली - देवघर रस्त्याची दुरावस्था पाहता तात्काळ रस्त्याची सुधारणा, डागडुजी करून रस्ता सुस्थितीत येईपर्यंत रस्त्यावरील अवजड वाहतूक तात्काळ बंद करावी, मौजे डोंगस्ते ते विजयगड येथील मे. श्रीजी स्टोन क्रशर कंपनीस 24 तास उत्खनन व वाहतुकीकरता परवानगी नसतानाही कंपनीकडून 24 तास सुरु असलेली वाहतूक व उत्खनन तात्काळ बंद करून संबंधितांवर कारवाई करावी, इत्यादी मागण्या घेऊन हे उपोषण सुरु असल्याचे मंचाच्या वतीने सांगण्यात आले. दरम्यान उपोषण कर्त्यांची प्रकृती आज तिसऱ्या दिवशी बिघडली.



# पनवेल येथे उद्योग सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे जिल्हा उद्योग केंद्र रायगड व लघु उद्योग भारती, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील सर्व उद्योजकांसाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत उद्योग सुसंवाद-2025 या कार्यक्रमाचे सकाळी 11.00 वा आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा, उद्योजक यांनी उपस्थितीत राहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळया यांनी केले आहे. या कार्यक्रमास जिल्हा पोलीस अधिक्षकअ आचल दलाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, नेहा भोसले आयुक्त, पनवेल महानगर पालिका, मंगेश चितळे व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळया तसेच जिल्ह्यातील सुमारे 300-400 उद्योजक उपस्थितीत राहणार आहेत. शनिवार, दि.23 ऑगस्ट रोजी पनवेल औद्योगिक सहकारी वसाहत मर्या.पनवेल येथे "हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र" वृक्ष लागवड अभियानांतर्गत वृक्षारोपणाचा कार्यक्रम सकाळी 10.00 वा. आणि जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक सकाळी 10:30 वा. होणार आहे.

# जिल्हा माहिती कार्यालयात छायाचित्र प्रदर्शन व कार्यशाळेचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जागतिक छायाचित्रण दिनाच्या निमित्ताने ठाणे जिल्हा माहिती कार्यालय, वेसाक इंडिया आणि शटर अँड लाईट क्रिएशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने ठाण्यात दि.19 ऑगस्ट रोजी एक खास छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला होता.

आता हे प्रदर्शन दि.22 ऑगस्ट रोजी सकाळी 11.30 वाजता पार पडणार असून या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप आणि पर्यावरण अभ्यासक तथा वृक्षपुरुष विजयकुमार कट्टी यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. हे छायाचित्र प्रदर्शन दि.22 ते 29 ऑगस्ट 2025 या कालावधीत सकाळी 11 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत ठाणे जिल्हा माहिती कार्यालय, टेरेस गार्डन, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वर, जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवार, ठाणे (पश्चिम) येथे नागरिकांसाठी आणि छायाचित्रप्रेमींसाठी विनामूल्य खुले असणार आहे.

ज्येष्ठ वृत्तपत्र छायाचित्रकार प्रफुल गांगुर्डे यांच्या निवडक छायाचित्रांचे हे प्रदर्शन असणार आहे. यामध्ये विविध विषयांवर त्यांनी क्लिक केलेली उत्कृष्ट छायाचित्रे पाहता येतील. या छायाचित्रांचे वैशिष्ट्य म्हणजे, या छायाचित्रांसाठी 'टाकावू पासून टिकावू' या संकल्पनेवर आधारित 'पर्यावरणपूरक' फ्रेम्स वापरण्यात आल्या आहेत. याशिवाय 'पिनहोल कॅमेरा' ची प्रतिकृती आणि जगातील पहिले छायाचित्र म्हणून नोंद असलेले छायाचित्र हे या प्रदर्शनामधील मुख्य आकर्षण असणार आहे.

या उपक्रमाच्या निमित्ताने दि.22 ऑगस्ट रोजी सकाळी 11.30 वाजता ठाणे शहरात गेल्या 15 वर्षांपासून वृत्तपत्र छायाचित्रकार म्हणून कार्यरत असलेल्या छायाचित्रकारांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. याशिवाय, 'छायाचित्रणाचे तंत्र आणि माहिती' या विषयावर 'शटर अँड लाईट क्रिएशन्स' च्या माध्यमातून एक मोफत कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. यात छायाचित्रणाचे मूलभूत तंत्र शिकायला मिळेल. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी https://forms.gle/wbw5wuGP2sfNiwkSA या गुगल फॉर्मद्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे.

या प्रदर्शनाला आणि कार्यशाळेला विद्यार्थी, नागरिक, आणि छायाचित्रप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# सार्वजनिक मंडळांना सणांसाठी अग्निशमन विभागाचा परवाना यावर्षी विनाशुल्क !



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : दि.18 ऑगस्ट 2025 रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व पोलीस विभाग यांचे समवेत कल्याण-डोंबिवलीतील श्री गणेश मंडळ पदाधिकाऱ्यांच्या झालेल्या समन्वय बैठकीत मंडप / स्टेज / कमानी परवानगीकरीता वाहतुक शाखा यांचा "ना हरकत दाखला", अग्निशमन विभागाचा "ना हरकत दाखला" व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी ली. (M.S.E.B.) यांचेकडील तात्पुरती विद्युत परवानगी इत्यादीकरीता संबंधित प्रभागक्षेत्र अंतर्गत प्रथमच "एक खिडकी योजने" अंतर्गत ऑनलाईन प्रणालीचा अवलंब करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी दिली होती.

आता या वर्षीच्या सार्वजनिक श्री गणेशोत्सव व नवरात्र उत्सवासाठी मंडप / स्टेज / कमानी चे शुल्क तसेच अग्निशमन विभागाचा परवाना शुल्क माफ *करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी जाहीर केला आहे, त्यामुळे महापालिका परिक्षेत्रातील सार्वजनिक श्री गणेश मंडळांमध्ये उत्साहाचे व समाधानाचे वातावरण पसरले आहे.


प्रति गाणगापूर
प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे

||श्री गुरुदेव दत्त||

लोभाने पाप घडत असते. पाप वाढल्यामुळे पृथ्वी रसातळाला जात असते. पृथ्वी म्हणजे, मानव समाज दुःख रुपी रसातळाला जात असतो. जेव्हापासून लोक मानू लागले आहेत की, पैशानेच सुख मिळते, तेव्हापासून जगात पाप फार वाढलेआहे. केवळ पैशानेच सुख मिळते, असे नाही. हिरण्याक्ष म्हणजे संग्रह वृत्ती आणि हिरण्यकश्यपू म्हणजे भोग वृत्ती. हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू यांना मारण्यासाठी भगवंताने क्रमशः वराह व नृसिंह अवतार घेतले. हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू हे लोभाचेच अवतार होत. भगवंताने कामाला मारण्यासाठी एकच अवतार घेतला. म्हणजे रावण व कुंभकरणाच्या संहारासाठी श्रीरामचंद्राचा अवतार घेतला. क्रोधाला मारण्यासाठी म्हणजेच शिशुपालला मारण्यासाठी एक कृष्णावतारच घेतला. परंतु लोभाला मारण्यासाठी दोन अवतार घ्यावे लागले. वराह-नृसिंह. यावरून हेच लक्षात येईल की लोभ जिंकणे कठीण आहे. लोभादीकांच्या भाराने पृथ्वी दुःख रुपी सागरात बुडाली होती म्हणून भगवंताने वराह रूप घेऊन तिला वर काढले वराह भगवान संतोषाचे अवतार आहेत. वरः म्हणजे श्रेष्ठ, अह म्हणजे दिवस. कोणता दिवस श्रेष्ठ आहे? ज्या दिवशी, तुमच्या हातून सत्कर्म घडेल तो दिवस. श्रेष्ठ कर्मानि दिवसही श्रेष्ठ बनत असतो. जे कर्म देवाला आवडते ते कर्मश्रेष्ठ होय. तेच सत्कर्म समजावे. सत्कार्यालाच यज्ञ समजावे.

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज
मो.नं.7038727403/9890226862


# नवजात अर्भकाला कचऱ्यात टाकणाऱ्या आरोपीला अटक



अल्पवयीन बालिकेस केले होते गर्भवती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : अल्पवयीन बालीकेस गर्भवती करून अपत्य जन्मास घालून नवजात अर्भकास कचऱ्यात टाकून देणाऱ्या आरोपीला खडकपाडा पोलीसांनी अटक केली आहे.

एका नवजात स्त्री जातीच्या अर्भकाला कल्याण पश्चिमेतील बारावे येथील कचराकुंडीत फेकल्या प्रकरणी खडकपाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयातील आरोपीने अल्पवयीन बालीकेवर मागील २ वर्षांपासून ती अल्पवयीन माहीत असतांना देखील तिच्या सोबत शारिरीक संबंध ठेवले होते. त्यामुळे ती गर्भवती राहीली, दि.१५ ऑगस्ट ला पहाटे नवजात स्त्री जातीच्या अर्भकास जन्म दिला. या बाळाला जन्माला घातल्याचे कोणाला समजु नये व त्यास सांभाळायची इच्छा नसल्याने त्यास मध्यरात्री कोणताही पुरावा मागे न ठेवता या नवजात अर्भकास बेवारस रित्या सोडून देवुन बाळाचे जिव धोक्यात टाकुन शिवमंदिर समोर कचऱ्याचे ढिगाऱ्या जवळ गवतामध्ये बारावे गाव कल्याण पश्चिम या ठिकाणी टाकले होते.

या गुन्हयातील पिडीत व आरोपीत यांचा कल्याण, आंबिवली, शहाडस्टेशन परिसरात प्रत्यक्ष व तांत्रिक विश्लेषन करून शोध घेवून तात्काळ पिडीतेला वैद्यकिय तपासणी व उपचार कामी रूग्णालयात दाखल केले. त्या नंतर आरोपीचा कल्याण शहर व परिसरात कसोशीने शोध घेतला असता आरोपीला मंगळवारी अटक करण्यात आली आहे. या गंभीर गुन्हयाचा तपास पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे, सहा. पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) मारूती आंधळे, तपास पथकाचे अधिकारी स.पो.निरी विजय गायकवाड, सपोनि सतिष पाटील, पोलीस उपनिरीक्षक भुषण देवरे व तपास पथकाचे अंमलदार यांनी केली आहे.

# अवैध गुटखा विक्रेता पेण पोलिसांच्या ताब्यात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : राज्य सरकारने प्रतिबंधित केलेला सुगंधित गुटखा विक्री करणाऱ्या युवकाला पेण पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडील हजारो रुपये किमतीचा गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थ जप्त केला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की पेण शहरातील खाटिक मोहल्ला येथील रहिवासी आपल्या घरातून गुटखा विक्री करत असल्याची माहिती पेण पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पेण पोलिसांनी 18 ऑगस्ट रोजी रात्री 10: 10 वाजता सदर ठिकाणी जाऊन शोध घेतला असता पोलिसांना आरोपीच्या ताब्यात 20 हजार 394 रुपयांचा केशर युक्त विमल पानमसाला आणि 2 हजार 266 रुपयांचा वि. 1 तंबाखू असे लिहिलेला माल असे एकूण 25 हजार 660 रुपये किमतीचा अवैधरित्या विक्री करणारा माल सापडल्याने पेण पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्या विरोधात गुन्हा रजिस्टर नंबर 158/2025 कलम 123,274,275 सह अन्न सुरक्षा मानके अधिनियम 2006 चे कलम 26 (2) (4),30 (2) (ए) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत पोलिस उपअधीक्षक जालिंदर नालकुल यांच्या आदेशानुसार आणि पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक निलेश रजपूत पुढील तपास करत आहेत.

## ठाणे महापालिकेतर्फे १५ सप्टेंबर रोजी
# परिमंडळ लोकशाही दिनाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : नागरिकांच्या वैयक्तिक तक्रारींचा निपटारा तातडीने होण्यासाठी तालुकास्तरिय लोकशाही दिनाच्या धर्तीवर, ठाणे महानगरपालिकेच्यावतीने दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी परिमंडळ स्तरावरही लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार, सोमवार, १५ सप्टेंबर, २०२५ रोजी परिमंडळ लोकशाही दिन होणार आहे. या लोकशाही दिनासाठी नागरिकांनी आपली निवेदने १ सप्टेंबरपर्यंत सादर करण्याचे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

नागरिकांनी आपली निवेदने पुढील ठिकाणी सादर करावीत.

परिमंडळ १ - (कळवा, मुंब्रा, दिवा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, कळवा प्रभाग समिती कार्यालय, कळवा

परिमंडळ २ - (नौपाडा, वागळे प्रभाग समिती अंतर्गत, उपायुक्त कार्यालय, नौपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)

परिमंडळ ३ - (उथळसर, वर्तकनगर, लोकमान्य. सावरकरनगर, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)

नागरिकांनी प्रथमतः परिमंडळ लोकशाही दिनात अर्ज दाखल करावेत. परिमंडळ लोकशाही दिनात दाखल केलेल्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही झाली नसल्यास नागरिक महापालिका लोकशाही दिनामध्ये नियमानुसार १५ दिवस आधी आपली निवेदने सादर करू शकतील. नागरिकांनी परिमंडळ लोकशाही दिनासाठी आपली निवेदने संबंधित परिमंडळ कार्यालयात सादर करावीत.

## स्मार्टसिटीच्या संथ कामामुळे
# कल्याण स्टेशन परिसराची बजबजपुरी | मुदत संपूनही सॅटीस प्रकल्पाचे काम अपूर्णच

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : देशातील 100 स्मार्ट शहरांमध्ये कल्याणचा समावेश असून या स्मार्ट सिटी अंतर्गत कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात सॅटीस प्रकल्पाचे काम गेली अनेक वर्षे सुरु आहे. मात्र मुदत संपूनही हे सॅटीस प्रकल्पाचे काम संथगतीने सुरू आहे. यामुळे कल्याण स्टेशन परिसराची अक्षरशः बजबजपुरी झाल्याचे चित्र दिसत आहे.



सॅटीस कामासाठी नियुक्त ठेकेदार कंपनी व महापालिका प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे स्टेशन परिसरात घाण, कचरा, दुर्गंधी, अस्वच्छता, फेरीवाले रिक्षांची गर्दी, बेशिस्त वाहतूक, सॅटीस कामी बाधीत झालेले दुरुस्ती अभावी खड्डेमय रस्ते विवीध समस्या, यामुळे स्टेशन परिसरात बकालपणा आला आहे. साधना हॉटेल ते बैलबाजार सर्कल रस्त्याची झालेली दुरावस्था, सॅटीस कामी बाधीत झालेला रिक्षा स्टॅण्ड पर्यायी व्यवस्था न केल्याने साधना हॉटेल येथे मुख्य रस्ता रिक्षांनी व्यापला आहे. कल्याण स्टेशन साधना हॉटेल ते बैलबाजार सर्कल हा मुख्य वाहतुकीचा रस्ता बंद आहे. साधना हॉटेल ते बैलबाजार सर्कल रस्त्याची दुरुस्ती करून रिक्षा काळी पिवळी टॅक्सी लोखंडी बॅरेकेटीगं करुन वाहतुक सुरळीत करण्याची आवश्यकता आहे. ऐतिहासिक कल्याण शहर हे मध्य रेल्वेचे जंक्शन अत्यंत गर्दीचे रेल्वे स्टेशन आहे. सॅटीस कामी दिपक हॉटेल समोरील शौचालय बाधीत झाले असून शौचालयाची पर्यायी व्यवस्था न केल्याने प्रवासी व नागरिक उघड्यावर लघुशंका करतात हि लाजिरवाणी बाब आहे. त्यामुळे या परिसरात साफसफाई करुन नागरीकांच्या सोयी सुविधा या करीता तात्पुरते फिरते शौचालयाची सोयी सुविधा उपलब्ध करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

सुरळीत सुरक्षीत वाहतुक व्यवस्था या करीता सक्षम वाहतुक पोलिस कर्मचारी व ट्राफिक वार्डन यांची सकाळी सात दुपारी दोन ते रात्री दहा वाजेपर्यंत दोन सत्रामध्ये नेमणूक करण्याची आवश्यकता असून सॅटीसच्या कामामुळे प्रभावित झालेल्या सोयी सुविधा पूर्ववत करण्यासाठी व समस्या सोडविण्यासाठी रिक्षा चालक मालक असोसिएशन संघटनेने आवाज उठवित आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र आगामी गणेशोत्सव व सणासुदीचे दिवस, मुसळधार पाऊस अतिवृष्टी मूळे नागरिकांना रिक्षा सेवा विस्कळीत होऊन त्रास होऊ नये म्हणून निर्दशने मोर्चा आंदोलन स्थगित करण्यात आले.

स्मार्ट सिटी महापालिका प्रशासनाने रिक्षा संघटनेला संपर्क साधून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. तसेच समस्या सोडविण्याचे लेखी पत्र दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित केले असल्याची माहिती रिक्षा संघटनेचे अध्यक्ष प्रणव पेणकर यांनी दिली. तर रिक्षा चालक मालक असोसिएशनच्या पत्र संदर्भ नुसार सॅटीस ठेकेदार कंपनीला कामात विलंब होत असल्याबाबत आपणास दंड का आकारला जाऊ नये असे महापालिका प्रशासनाकडुन नोटीस पत्र पाठविण्यात आले आहे.

# खातिवली ग्रामपंचायतीचा खंडीत पाणी पुरवठा भर पावसातही सुरळीत



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाशिंद : शहापूर तालुक्यातील खातिवली गावाचा दोन दिवस खंडीत झालेला पाणी पुरवठा भर पावसात परिश्रम करून सुरू केल्याने ग्रामस्थांकडून कौतूक होत आहे.

शहापूर तालुक्यातील खातीवली ग्रामपंचायतीचा गावातील पाणी पुरवठा दोन दिवस खंडीत झाला होता. मोटर जळाल्याने पाणी पुरवठा खंठित झाला आहे. अशी चर्चा गावात होती.दोन दिवस पावसाने घातलेला धुमाकूळ पहाता आता लवकर पाणी पुरवठा सुरू होतो की नाही. या चिंतेंने ग्रामस्थांच्या भर पावसातही घशाला कोरड पडली होती. मात्र नेहमी प्रशासकीय कामात दक्ष असलेल्या खातिवली ग्रामपंचायतीचे सरपंच मनोहर भोईर , उपसरपंच राहूल गुजरे, सदश्य व पाणी पूरवठा कर्मचारी यांनी धो-धो पडणा-या पावसाची पर्वा न करता २४ तास युध्दपातळीवर काम करून खंडीत झालेला पाणी पुरवठा सुरू करण्यात यश मिळवले. मात्र नदी पात्रात पावर हाऊस नदिच्या पाण्याच्या विळख्यात गेल्याने तातडीने दुरूस्ती करूनही पाणी सोडू शकले नाहीत. मात्र हार न मानता पाण्याचा प्रवाह कमी होताच पाणी पुरवठा सुरू केल्याने ग्रामस्थांकडून कौतूक होत आहे.

> सुरळीत सुरु असलेली पाण्याची मोटार जळाली तर दुसरी मोटार आमच्याकडे तयार असते. चालू मोटार जळाल्याने सतत पडणा-या पावसाची पर्वा न करता दुसरी मोटार लावून पाणी पुरवठा तातडीने सुरळीत करण्याचा प्रयत्न केला.मात्र विद्दूत पुरवठा कमी दाबाचा मीळत असल्याने तीही मोटर जळाल्याने दोन दिवस पाणी पुरवठा सुरळीत करता आला नाही. मात्र दुसरी मोटार उपलब्द करून खंडीत झालेला पुरवठा सुरळीत करण्यास यश आले.मात्र पावर हाऊस जवळ पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने पाणी पुरवठा सुरू करण्यास थोडा वेळ गेला.- मनोहर भोईर, सरपंच खातीवली.

# अतिवृष्टीचा विचार करून ठाणे जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा : दयानंद चोरघे यांची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : ठाणे जिल्ह्यात गेल्या तीन चार दिवस सतत मुसळधार पाऊस पडल्याने अनेक भागात पुरजन्य परिस्थिती उद्भवली आहे.या पडलेल्या मुसळधार पावसाचे पाणी शेतात शिरून शेतपिकांचे मोठे नुकसान झाले आहे, उभी पिके वाहून गेली आहेत. अतिवृष्टीमुळे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी,शहापूर,मुरबाड,कल्याण, अंबरनाथ तालुक्यातील शेतपिकांचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. ठाणे जिल्ह्यातील सध्याची सर्व परिस्थिती पाहता ठाणे जिल्हाधिकारी व महसूल विभाग अधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करून ओला दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीने मदत द्यावी अशी मागणी ठाणे ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी केली आहे.

ठाणे जिल्हाधिकारी यांना या संदर्भात दयानंद चोरघे यांनी याबाबत निवेदन दिले असून निवेदनात म्हटले आहे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी सह सर्वच तालुक्यांना या पावसाचा मोठा फटका बसला आहे,जिल्ह्यात मोठ्या



प्रमाणात भात पीक घेतले जात असून आदिवासी पट्ट्यात नागलीचे पीक घेतले जाते या दोन्ही पिकांसह भाजीपाल्याचे मोठे नुकसान झाले आहे,तर काही ठिकाणी शेतकऱ्याचे पशूधन वाहून गेले आहे.वाढत्या महागाईने आधीच संकटाचा सामना करत असलेल्या शेतकरी बळीराजाला निसर्गाने आणखी संकटात टाकले आहे. राज्य सरकारने पंचनामे करण्याचे आदेश दिले असले तरी सरकारने या कठीण प्रसंगी सर्व नियम, अटी व शर्थी बाजूला ठेवून शेतकऱ्यांची मदत केली पाहिजे अशी मागणी निवेदनात जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी केली आहे. राज्यासह संपूर्ण ठाणे जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्याला हेक्टरी 50 हजार रुपये मदत करावी अशी मागणी ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी केली आहे.


जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558



*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*
*Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024*